# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
# अमरावती विभागीय मंडळ, अमरावती.

**महत्वाचे/तातडीचे**

पत्र क्र.अविमं/मागो/१९२८
अमरावती,दि.२३/११/२०२०

**प्रति,**

मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा,
अमरावती विभाग, अमरावती.

**विषयः- माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा मार्च-२०२१ करीता परीक्षक/समिक्षक यांची माहिती मंडळाच्या profile link वर अद्यावत करणेबाबत.**

उपरोक्त विषयास अनूसरून आपणास कळविण्यात येते की, माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा मार्च-२०२१ लिखित उत्तरपत्रिका मुल्यांकनासाठी परीक्षक/समिक्षकांचे पॅनल अद्यावत करावयाचे आहे.

आपण सन २०१९-२० साली मंडळाकडे सादर केलेली प्रोफाइलची माहिती दुरूस्तीसह सन २०२०-२१ च्या शाळेच्या प्रोफाईल वरून http://profile.mh-ssc.ac.in या वर अद्यावत करण्यात यावी. विनाअनुदानीत/स्वयंअर्थसहाय्यित शाळेतील शिक्षक ऐनवेळेवर उत्तरपत्रिका तपासणीच्या वेळी सेवा सोडून गेल्याने किंवा सेवेतून कमी केल्याचे कळविले जाते. त्यामुळे मंडळाच्या कामात अडचण निर्माण होवून निकालाच्या प्रक्रियेला विलंब होतो. ज्याअर्थी आपण इ. १० वी करीता विद्यार्थी प्रविष्ठ केले त्याअर्थी त्यांचे अध्यापन व मुल्यमापन करणे ही संबंधित अध्यापकाचे कर्तव्य (जबाबदारी) आहे. सबब सदर लिंक वर माहीती भरत असतांना अध्यापन करणाऱ्या सर्व शिक्षकांची माहिती भरण्यात यावी. तसेच शिक्षकांची बदली/सेवा निवृत्ती/सेवा सोडून गेलेले शिक्षक/नविन शिक्षकांची नेमणूक/मृत शिक्षक इ. चा समावेश करावा.

सर्व माहिती भरून झाल्यानंतर मुख्याध्यापकाने स्वत: स्वाक्षरी करून सॉफ्ट कॉपी sscboardamravati@gmail.com या email वर **दिनांकः-१५/१२/२०२०** पर्यंत अपलोड करण्यात यावी. अपूर्ण वा चुकीच्या माहीती करीता आपणास जबाबदार धरण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**विभागीय सचिव,**
अमरावती विभागीय मंडळ,अमरावती.

**प्रतिलिपीः-** १. शिक्षण उपसंचालक अमरावती विभाग अमरावती यांना माहीती व कार्यवाहीस्तव सादर.
२. शिक्षणाधिकारी(माध्यमिक),जिल्हा परिषद अकोला,अमरावती,बुलढाणा,यवतमाळ,वाशिम, यांना माहीतीस्तव सादर.

Scanned with CamScanner